# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL


# स्वातंत्र भारताचे अमृत महोत्सव वर्ष : एक चिंतन

**Oct. 2021 Special Issue- 43 Vol. 1**

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**

| Special Issue 43, Vol. 1 Oct. 2021 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|



12. लोकशाही आणि निवडणूका 43
प्रा.डॉ.अरूण महादेव राख

13. भारतातील आदिवासी समूह एक चिंतन 46
प्रा.डॉ.आचार्य आर.डी.

14. स्वातंत्र्योतर कालखंडातील शैक्षणिक धोरणांची वाटचाल 48
अंकुश भागवत सोनवणे

15. स्वातंत्र्य भारतातील शिक्षणाची वाटचाल आणि सद्य:स्थिती 52
प्रा.डॉ.बन वशिष्ठ गणपतराव

16. भारतीय लोकशाही आणि प्रसार माध्यमांची भूमिका 55
डॉ. कैलास सोनू महाले
लक्ष्मण गजानन गणगे

17. स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत आदिवासी समूहाच्या जीवनशैलीत आलेले बदल : एक विश्लेषणात्मक अध्ययन 59
डॉ. निलेश र. निंबाळकर

18. आदिवासी जननायक बिरसा मुंडा 66
सहा. प्राध्यापक, डी.एन.रिठे

19. भारतातील आदिवासी समूह आणि निसर्गवाद 68
बांगर नितीनकुमार बाबासाहेब.

20. भारतातील आदिवासी समूह आणि नक्षलवाद 72
डॉ. सखाराम डाखोरे

21. भारतातील आदिवासींचा समूहः एक चिंतन 75
डॉ. स्मिता शामराव पाटील

22. नैसर्गिक संकटे आणि आपत्ती व्यवस्थापन धोरण 78
प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे

23. महानगरपालिका प्रशासनात माहिती अधिकाराचा वापर : एक अभ्यास 82
दळवे बालाजी भाऊसाहेब

# आदिवासी जननायक बिरसा मुंडा

सहा. प्राध्यापक, डी.एन.रिठे
इतिहास विभाग, र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड

---

प्रास्ताविक

आदिवासी चळवळींमध्ये सर्वात विस्तृत आणि संघटित चळवळ मुंडा या आदिवासी जमातीची होती. या आंदोलनाचे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले. या बंडाला उलगुलान असेही म्हणतात, ज्याचा अर्थ महान बंड असा होतो. १८५७ च्या क्रांतीनंतर इंग्रजांनी छोटा नागपूर प्रदेशातील मुंडा आदिवासींच्या शेतजमिनी हिरावून घेतल्या होत्या. त्या परत मिळविण्यासाठी मुंडांच्या प्रमुखानी इंग्रजांविरुद्ध संघर्ष सुरू केला. या आंदोलनात्मक लढाईचा बिरसांच्या मनावर मोठा प्रभाव पडला होता. त्यांनी इंग्रजांच्या गुलामीत असलेल्या आदिवासी समाजाला मुक्त करण्यासाठी क्रांतिकारक चळवळीला सुरुवात केली. त्यामुळे अनेक मुंडा आदिवासींनी बिरसांबरोबर या आंदोलनात सहभाग घेतला.या आंदोलनाची मुख्य कारणे जहागीरदारांकडून जमीन हक्कांचे होणारे उल्लंघन, वसाहतीक शोषणाची धोरणे आणि वाढती कामगारावरील जबरदस्ती ही होती. या बंडाचा हेतू अंतर्गत शुद्धीकरण, वसाहती सत्तेपासून स्वातंत्र्य आणि स्वतंत्र मुंडा राज्याची स्थापना हा होता.

उदिष्ट्ये :

- बिरसा मुंडाच्या चरित्राचा अभ्यास करणे
- बिरसा मुंडाने ब्रिटीश साम्र्ज्यवादाविरूद्ध केलेल्या उठावाचा अभ्यास करणे
- मुंडा आंदोलनाचा आदिवासी जमातीवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोध निबंधाकरिता ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून त्यासाठी दुय्यम साधनाचा त्यामध्ये संदर्भ ग्रंथ,विषयाशी संबधित साहित्य, वृत्तपत्रे इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आलेला आहे.
झारखंड मधील आदिवासी समाजात सामूहिक जमीन मालकीवर आधारित कृषी प्रणाली होती. ब्रिटिश सरकारने इ.स. १८५७ चा उठाव दडपून टाकल्यानंतर छोटा नागपूर प्रदेशातील ही व्यवस्था रद्द केली आणि त्यांच्यावर खाजगी जमीन मालकीची व्यवस्था लादली. यामुळे ब्रिटीश सरकारचा महसूल वाढला. पारंपारिक पद्धतीने शेतीची कामे केल्याने येथील जमीन नापीक होऊन उत्पादन खूप कमी होउ लागले.त्यामुळे बहुतेक शेतकरी वाढीव महसूल दराने कर देऊ शकले नाहीत. कर भरण्यासाठी शेतकरी सावकारांकडून कर्ज घेत आणि ते या कर्जाच्या जाळयात अडकत असत. ज्या शेतकऱ्यांना कर देता आले नाही त्यांच्या जमिनी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जप्त केल्या. त्यांना त्यांच्याच जमिनीतून बेदखल केल्यामुळे आदिवासी समाजात नाराजी पसरली.या शोषण आणि दडपशाहीच्या विरोधातील ही चळवळ बिरसा मुंडा नावाच्या आदिवासी नेत्याने चालवली.

**बिरसा मुंडा :**

बिरसा मुंडा त्यांचा जन्म झारखंडमधील उलिहातु या छोट्याशा खेड्यात जन्म 18 नोव्हेंबर 1875 रोजी वडील सुगना व आई करमी या दांपत्यापोटी झाला. जन्म गुरुवारी म्हणजे बृहस्पतिवार या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव 'बिरसा' ठेवण्यात आले. बिरसांना शिक्षणाची आवड होती. बिरसांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले (१८८६). तत्पूर्वी शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला. शाळेमध्ये जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी भाषणामध्ये मुंडा आदिवासींबद्दल ठग, चोर, बेइमान इत्यादी शब्दांचा वापर केला. तेव्हा बिरसा यांनी फादर नोट्रोट यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. त्यामुळे बिरसांना शाळेतून काढण्यात आले (१८९०).पुढे त्यांनी शिक्षणासाठी अंगीकारलेल्या ख्रिश्चन धर्माचा त्याग केला. उदरनिर्वाहासाठी ते बांदगाव येथे वास्तव्यास असताना (१८९०–९४). त्यांचा विवाह हिरीबाई नामक मुलीशी झाला, परंतु अल्प काळातच तिचे निधन झाले. बिरसा यांनी आनंद पांडे या वैष्णवपंथीयांकडून धार्मिक शिक्षण घेतले. हे शिक्षण घेत असताना मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धतीमध्ये, धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बिरसा यांनी मुंडा समाजाला पारंपारिक चालीरीतींपासून मुक्त करून देवावर विश्वास ठेवण्यास प्रेरित केले. त्याने आपल्या अनुयायांना अनेक देव -देवता वगळता एकच देव सिंहबोंगाची पूजा करण्याचे आदेश दिले. त्याने स्वतःला देवाचे प्रतिनिधी म्हणून घोषित केले आणि सांगितले की परदेशी गुलामगिरीतून सुटका आणि सुसंस्कृत समाजाच्या स्थापनेसाठी देवाने मुंडा त्याच्याकडे पाठवला आहे. त्यांनी अनुयायांना सरकारला कर न देण्याचे आदेश दिले. अनेक लोक बिरसा यांच्या शिकवणींनी प्रभावित झाले आणि हळूहळू बिरसा चळवळ संपूर्ण आदिवासी भागात पसरली.

**बिरसा मुंडाचा ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध उठाव :**

1894 मध्ये, पावसाच्या अभावामुळे, छोटा नागपुरात भीषण दुष्काळ आणि साथीचे रोग पसरले. बिरसा यांनी संपूर्ण समर्पणाने आपल्या लोकांची सेवा केली. अंधश्रद्धेतून बाहेर पडून त्यांनी लोकांना रोग बरा करण्याविषयी जागरूक केले. सर्व आदिवासींसाठी ते 'धरती आबा' म्हणजेच 'पृथ्वीचे जनक' बनले. ब्रिटिशांनी 'भारतीय वन कायदा 1882' पास करून

Special Issue 43, Vol. 1 Oct. 2021 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

आदिवासींना जंगलाच्या अधिकारापासून वंचित ठेवले. ब्रिटीशांनी आदिवासी गावांना विभागून, जिथे ते सामूहिक शेती करायचे, जमीनदार आणि दलालांमध्ये जमीनदारी पद्धत लागू करून महसूलची नवीन प्रणाली लागू केली. आणि मग सुरू झाले ब्रिटिश, जमीनदार आणि सावकारांकडून निरपराध आदिवासींचे शोषण. बिरसा यांनी या शोषणाविरुद्ध बंडाची ठिणगी पेटवली. आपल्या लोकांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी बिरसा यांनी 'उलगुलान' चा नारा दिला. 1895 मध्ये, बिरसा यांनी ब्रिटिश अंमलदार, जमीनदारी आणि महसूल व्यवस्थेविरोधातील लढा सुरु केला. हे फक्त बंडखोरी नव्हती उलट तो आदिवासींचा स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि संस्कृती वाचवण्याचा संघर्ष होता.बिरसा यांनी 'अबुआ दिशूम अबुआ राज' म्हणजेच 'आमचा देश, आमचा राज' असा नारा दिला. लवकरच सर्व आदिवासी जंगलावर हक्क सांगण्यासाठी जमले. ब्रिटिश सरकारचे पाय सरकू लागले आणि भ्रष्ट जमीनदार आणि भांडवलदार बिरसाच्या नावाने घाबरू लागले.ब्रिटीश सरकारने बिरसाचे उलगुलान दडपण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, परंतु आदिवासींच्या गनिमीकाव्यामुले ते अयशस्वी झाले. इ.स.1897 दरम्यान आदिवासी आणि ब्रिटिश यांच्यात अनेक लढाया झाल्या. पण प्रत्येक वेळी ब्रिटीश सरकारने तोंडघासी पडले. ब्रिटीश सरकारने बिरसांना बंदी करण्याचे ठरविले व 26 ऑगस्ट 1895 रोजी बिरसा व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडले परंतु बिरसांच्याअटकेमुळे आदिवासी समाजात वाढत असलेल्या असंतोषाला बघून त्यांची 30नोव्हेंबर 1897 रोजी सुटका करण्यात आली.

कैदेतून सुटल्यानंतर बिरसांनी सेवादलाची स्थापना केली. गावोगावी गुप्त बैठका घेऊन मुंडाराज्य स्थापन करण्याच्या शपथा घेण्यात आल्या. त्यामध्ये सुमारे ५,००० आदिवासी सामील झाले. बिरसांनी कायद्याची लढाई सोडून २५ डिसेंबर १८९९ पासून इंग्रज अधिकारी, इंग्रजधार्जिणे ठेकेदार, जमीनदार, सावकार व ख्रिश्चन धर्मप्रसारक यांच्याविरोधात आक्रमक पवित्रा घेत प्राणघातक हल्ले करण्यास सुरुवात केली. सिंगभूम, चक्रधरपूर, रांची, खुंटी, कोरा, तामाड या प्रदेशांतील पोलीसचौक्या जाळण्यात आल्या. या मुक्तीआंदोलनाला मुंडारी भाषेत 'उलगुलान' असे म्हणतात. या आंदोलनात आदिवासींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. पोलिसांच्या गोळीबारात व मुंडांच्या तिरकामठ्यांद्वारे हजारो पोलीस व मुंडा आदिवासी मारले गेले. अखेर बिरसांना शह देण्यासाठी ब्रिटिशानी कूटनीतीचा वापर केला. जेव्हा ब्रिटीश सरकारने बिरसाला पकडण्यासाठी 500 रुपयांचे बक्षीस जाहीर केले, तेव्हा त्याच्याच व्यक्तीकडून कोणीतरी बिरसाच्या ठावठिकाणाचा पत्ता ब्रिटिशांना आणला. बिरसानां ब्रिटिशाच्या बंदुका आणि तोफांची ताकद पकडू शकली नाही, त्याना अटक होण्याचे कारण त्याच्या स्वतःच्या लोकांची फसवणूक होती.जानेवारी 1900 मध्ये, बिरसा उलिहातूजवळ डोंबारी टेकडीवर त्याच्या जाहीर सभेला संबोधित करत असतांना, ब्रिटिश सैनिकांनी त्याला चारही बाजूंनी घेरले. ब्रिटिश आणि आदिवासींमध्ये लढाई झाली. महिला आणि लहान मुलांसह अनेक लोक मारले गेले. शेवटी बिरसा यांना 3 फेब्रुवारी 1900 रोजी चक्रधरपूर येथे अटकही करण्यात आली.

रांची येथे कैदेत असताना इंग्रजांनी त्यांचा अतोनात छळ केला. तेथेच त्यांचे निधन झाले.बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. ब्रिटिशांनी 'छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट' मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले (१९०२).

निष्कर्ष :

आदिवासीचे हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून बिरसा यांची ओळख आहे.वयाच्या 25 व्या वर्षी बिरसा मुंडा यांनी सुरू केलेली क्रांती नेहमीच आदिवासींना प्रेरित करते.बिरसा मुंडा गेल्याच्या इतक्या वर्षानंतरही आदिवासींचा संघर्ष सुरूच आहे. अनेक आदिवासी संघटना आहेत, ज्या अजूनही आदिवासींचा जंगलावरील हक्क, सामाजिक प्रतिष्ठा, व साविधानानुसार त्यांन मिळालेले अधिकार मिळवण्यासाठी लढत आहेत.तसेच बोगस जातचोर आदिवासी विरुद्ध लढा देत आहेत या सर्वांनी मिळून बिरसा उत्सव साजरा करणे सुरू केले आहे. बिरसा मुंडा या सर्व आदिवासी जमातीसाठी प्रेरणास्थान आहेत.

संदर्भ सूची

- भागवत, मोहन, अनु. माधवदास, *बिरसा मुंडा*, नागपूर, २०००.
- सिंह, कुमार सुरेश, *बिरसा मुंडा और उनके आंदोलन*, नवी दिल्ली, २०००.